# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६१(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ १८८

दिनांक :- 17 JAN 2019

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय / अनुदानित / विना-अनुदानित

पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,

**औरंगाबाद विभाग**

**विषय :** - शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर "नोंदणी प्रक्रिया" पूर्ण करण्याबाबत.

संदर्भ : १ मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/०४८ दि. ११/०१/२०१९

२ मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/ एडीएम/ २०१९/५१ दि. १५/०१/२०१९.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सन २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी प्रक्रियेकरिता प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर "नोंदणी प्रक्रिया" अद्यापही या विभागातील बहुतांशी शासकीय/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी पूर्ण केलेली नसल्याचे मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी निर्देशनास येत असल्याचे कळविले आहे, तथापि महाविद्यालयांना शेवटची संधी म्हणून दिनांक १२/०१/२०१९ ते २१/०१/२०१९ पर्यंत रु. ५०, ०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) दंड भरण्याच्या अटींवर मूदतवाढ देण्याचे प्राधिकरणाने निश्चित केलेले आहे.

तथापि, तद्नंतर सदर प्रक्रियेसाठी जी शासकीय/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालये "नोंदणी प्रक्रिया" करण्यास असमर्थ ठरतील, अशा महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांच्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरण मुंबई यांच्या मार्फत शासनाला अवगत करण्यात येईल तसेच संबंधीत महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने उचित कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

सोबत :- संदर्भिय पत्र

प्रत:- १ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२ या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थाळावर प्रसिध्द करण्यासाठी.

C:\Users\admin\Desktop\Working RK\Institute Letter 2018-19.docx

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

E-mail :dtedesk2a@ dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


क्र.२अ/एडीएम/२०१९/ ५१

दि. 15 JAN 2019

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर "नोंदणी प्रक्रिया" पूर्ण करण्याबाबत.

संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे दि.११/०१/२०१९ रोजीचे परिपत्रक क्रमांक : संकीर्ण/ प्र.क्र. १७०/प्रनिप्रा/०४८

उपरोक्त विषया संदर्भाधीन परिपत्रकाची प्रत आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे कृपया पहावे.

संदर्भाधीन परिपत्रकातील सूचना विचारात घेऊन आपल्या अधिनस्त सर्व संबंधित संस्थांच्या निदर्शनास सदर बाब आणावी.

(प्रमोद नाईक)

सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत : १) मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

\\192.168.1.9\Desk2a\Desk 2a (Sumit)\2018-19\letter 2018-19.docx

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांकः संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/०४८

दिनांक : 11 JAN 2019

**परिपत्रक**

**विषय :** **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर "नोंदणी प्रक्रिया" पूर्ण करण्याबाबत...**

**संदर्भ :** **प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/०१/२०१९ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्र. ७ मधील निर्देशानुसार सादर.**

विषयांकित प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी प्रक्रियेकरिता प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर "नोंदणी प्रक्रिया" अद्यापही बहुतांशी शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी पूर्ण केलेली नसल्याचे निर्दशनास येत आहे, तथापि महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन संबंधीत महाविद्यालयांना शेवटची संधी म्हणुन दिनांक १२/०१/२०१९ ते २१/०१/२०१९ पर्यंत रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) दंड भरण्याच्या अटींवर मूदतवाढ देण्याचे प्राधिकरणाने निश्चित केलेले आहे.

तथापि, तद्नंतर सदर प्रक्रियेसाठी जी शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये "नोंदणी प्रक्रिया" करण्यास असमर्थ ठरतील अशा महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांच्याबाबत शासनाला अवगत करण्यात येईल तसेच संबंधीत महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने उचित कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

(आ.ए. रायते) भा.प्र.से.
**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.**

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित,-
संचालक तथा नोडल अधिकारी, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण / वैद्यकीय शिक्षण / आयुष शिक्षण / कृषी शिक्षण / कला शिक्षण / मत्स्य व दुग्ध शिक्षण, महाराष्ट्र राज्य.